बुधवार, दि २१ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २० वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** ''हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील सर्व समाजातील भाविक, सामाजिक संस्था, संघटना व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घेवून आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. येथील जिल्हा नियोजन सभागृहात ''हिंद-दी-चादर'' कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, किशन राठोड, लखीम सिंग, विलास राठोड, महंत नेहरुजी महाराज आदी मान्यवरांची उपस्थिती होती. 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात जिल्हा प्रशासनामार्फत या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, आणि सीएसआरच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्यातून शक्य तेवढी मदत पोहचविण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन आणि समाज घटकांमार्फत करण्यात येत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाची माहिती जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांना व्हावी यासाठी विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये प्रभात फेरीचे आयोजन करुन, सतिंदर सरताज यांचे भक्ती गीत गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व




स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करुन या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर जी यांचे महान कार्य आणि हौतात्म्याचा इतिहासाची माहिती विद्यार्थी-विद्यार्थीनी देण्यात आली आहे. तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडिया, होर्डिंग्स, फ्लेक्स, प्रसिध्दी पत्रके, चित्ररथ, शासकीय-निमशासकीय कार्यालये, चित्रपट गृहे, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, मुख्य चौक व मुख्य रस्त्यांवर फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग्स् आदीच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील जास्तीत-जास्त भाविकांना या कार्यक्रमास उपस्थित राहाता यावे यासाठी विशेष रेल्वे आणि बसेसचे नियोजन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व समाज एकत्र येवून त्यांच्यात देशभक्ती निर्माण होणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन जिल्हाधिकरी श्रीमती मित्तल यांनी केले. यावेळी विविध समाजातील मान्यवर आणि नागरिकांची उपस्थिती होती.

## मंठा येथून चोरीस गेलेल्या पिकअप वाहनाचा चंदनझिरा पोलिसांनी लावला शोध

### एमआयडीसी भागातून वाहन हस्तगत

**जालना । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातून चोरीस गेलेल्या पिकअप वाहनाचा चंदनझिरा पोलिसांनी यशस्वी शोध लावत आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. या उल्लेखनीय कामगिरीमुळे चंदनझिरा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



पोलीस स्टेशन मंठा हद्दीतून दि. १५ जानेवारी २०२६ रोजी पिकअप वाहन चोरीस गेले होते. याप्रकरणी फिर्यादी सुरेश विश्वनाथ अवचार (रा. विधोळी, ता. मंठा) यांनी मंठा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून गुन्हा रजिस्टर नंबर ००११/२६ कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. चोरीस गेलेल्या पिकअप वाहनाचा क्रमांक -२० -८९४९ असून वाहनाची पान २ वर

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची उल्लेखनीय कामगिरी

## दोन वर्षातील प्रलंबित गुन्ह्यांचा छडा; सांगली व सोलापूर जिल्ह्यातून पिडीत मुलींची सुटका

**जालना । प्रतिनिधी -** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, जालना यांनी सन २०२३ व २०२४ मध्ये दाखल झालेल्या दोन गंभीर गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावत पळवून नेण्यात आलेल्या अल्पवयीन मुलींची सुटका केली असून आरोपींनाही ताब्यात घेण्यात आले आहे. या कामगिरीमुळे जिल्ह्यातील पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.




सेवली पोलीस ठाण्यातील गुन्ह्याचा उलगडा पोलीस ठाणे सेवली येथे दिनांक २७ मार्च २०२३ रोजी फिर्यादी विजय धर्मा राठोड (वय मजुरी व्यवसाय, रा. वझर सरकटे, ता. मंठा, जि. जालना) यांनी तक्रार दिली होती की, त्यांच्या अल्पवयीन मुलीला गावातीलच आरोपी महादेव जनार्धन मुसळे याने दिनांक २५ मार्च २०२३ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास फुस लावून पान २ वर

# जालना शहरातील उर्वरित विकास कामे पूर्ण करणार - भास्कर दानवे

### प्रभाग क्र. १ मधील शिक्षक कॉलनीत भाजपा विजयी उमेदवारांचा भव्य सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने वजियी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने शिक्षक कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी भास्कर दानवे यांनी बोलताना सांगितले की, जनतेने दिलेला मतदान रूपी कौल हा केवळ सन्मान नसून, मोठी जबाबदारी असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शिक्षक पान २ वर



## धर्मरक्षणासाठी घराघरांतून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण होण्याची गरज ! श्रीमंत मुधोजी राजे भोसले




**दुर्ग (छत्तीसगड) । प्रतिनिधी -** ''जेव्हा जेव्हा आपल्या माता-भगिनींवर आणि धर्मावर संकटे आली, तेव्हा तेव्हा आपल्या महापुरुषांनी मोठ्या शूरतेने आणि वीरतेने त्याचा सामना केला. वर्तमान स्थिती देखील आव्हानात्मक आहे. आज धर्म आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी घराघरांतून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण होण्याची आवश्यकता आहे,'' असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांनी केले. हिंदू जनजागृती समिती आणि वैदिक गुरुकुल वेलफेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्ग येथील महेश कॉलनी (पुलगाव, छत्तीसगड) मध्ये आयोजित दोन दिवसीय अनिवासी पान २ वर

## संपादकीय

# स्वैर गोलंदाजी अन् फलंदाजांची हाराकिरी

भारतीय क्रिकेट संघ जगातील एक बलाढ्य क्रिकेट संघ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भारतीय संघाला हरवणे ही तशी सोपी गोष्ट नसते त्यात जर मालिका भारतात असेल तर भारतीय संघाला हरवणे ही जवळपास अशक्यप्राय गोष्ट पण हा झाला भुतकाळ. आता भारतीय संघाला भारतात येऊन कोणीही सहज हरवू शकतो हे न्यूझीलंड संघाने सिद्ध केले. न्यूझीलंड संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून भारतीय संघासोबत तो तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळला. या मालिकेतील पहिला सामना भारतीय संघाने सहज जिंकत मालिका आपणच घशात घालणार अशा आविर्भावात उरलेले दोन सामने खेळला आणि तिथेच घात झाला. पहिल्या सामन्यात पराभूत झालेल्या न्यूझीलंड संघाने उरलेल्या दोन सामन्यात भारतीय संघाला सहज हरवले आणि मालिका २ - १ ने जिंकत इतिहास घडवला. न्यूझीलंड संघासाठी हा मालिका विजय ऐतिहासिकच आहे कारण न्यूझीलंडने पहिल्यांदाच भारताला भारतात हरवून मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. त्यांच्या डॅरिल मिचेल या फलंदाजाने सलग दोन सामन्यात शतक झळकावले तसेच पहिल्या सामन्यात ८५ धावांची खेळी करून भारतीय गोलंदाजांची पिसे काढली. त्यांच्या इतर फलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. त्यांच्या गोलंदाजांनी आपल्या फलंदाजांना मोक्याच्या वेळी बाद करून न्यूझीलंड संघाला मालिका विजय मिळवून दिला. न्यूझीलंडच्या या मालिका विजयाने क्रिकेट प्रेमींना धक्का बसला असला तरी क्रिकेट जाणकारांसाठी मात्र भारताचा हा पराभव अपेक्षितच होता कारण गेल्या काही वर्षात कसोटी असो की एकदिवसीय मालिका भारतीय संघ परदेशी संघापुढे लोटांगण घालत आहे. याआधी दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या संघाने भारताला भारतात येऊन कसोटी किंवा एकदिवसीय मालिकेत नमवले आहे. परदेशी संघ भारतात येऊन भारतीय संघाला धूळ चारत असतानाही भारतीय संघाच्या कामगिरीत कोणतीही सुधारणा होत नाही हे विशेष. भारतीय संघाचा सातत्याने पराभव होत असतानाही निवड समिती असो की बीसीसीआय, खेळाडू असो की संघ व्यवस्थापन याचे विश्लेषण किंवा पराभवाचे आत्मचिंतन करत नाही. न्यूझीलंडने भारतावर मिळवलेला विजय फलंदाजांची हाराकिरी आणि स्वैर गोलंदाजीमुळे झाला आहे हे कोणीही सांगेल. न्यूझीलंड संघाने तीनही सामन्यात जवळपास ३०० च्या वर धावा काढल्या याचाच अर्थ भारतीय गोलंदाजांची त्यांनी यथेच्छ धुलाई केली. भारतीय संघात हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा या गोलंदाजांना का खेळवण्यात येत आहे असा प्रश्न पडतो कारण या दोन्ही गोलंदाजांची प्रत्येक सामन्यात यथेच्छ पिटाई होते. संपूर्ण मालिकेत या दोन्ही गोलंदाजांनी खूप धावा दिल्या जवळपास एका षटकात ७ च्या सरासरीने त्यांनी धावा दिल्या हे फक्त न्युझीलंड विरुद्धच्या मालिकेतच घडले असे नाही तर याआधीही त्यांना असाच मार पडला आहे तरीही त्यांना खेळवण्याचा अट्टाहास केला जातो. प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे ते लाडके असल्याने त्यांना संधी दिली जाते का ? हा प्रश्न पडतो. एकीकडे खूप मार खाऊनही त्यांना संघात स्थान दिले जातेय तर मोहम्मद शमी सारखा दर्जेदार गोलंदाज सातत्याने चांगली गोलंदाजी करूनही त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. मोहम्मद शमीला का डावलले जाते याचे उत्तर निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाने द्यायला हवे. रवींद्र जडेजा हा भारताचा अष्टपैलू खेळाडू पण एकदिवसीय सामन्यात त्याने अपवादात्मक परिस्थितच अष्टपैलू खेळ केला आहे. एकदिवसीय सामन्यात भारतात अर्धशतक झळकावून त्याला जमाना झाला. गोलंदाजीतही त्याची धार कमी झाली आहे. कुलदीप यादवच्या फॉर्म ही हरवला आहे. या मालिकेत जसप्रीत बुमरा आणि हार्दिक पांड्याची उणीव भारताला जाणवली. या मालिकेत कोहलीने अपेक्षित धावा काढल्या मात्र त्याला इतर फलंदाजाकडून साथ मिळाली नाही. रोहित शर्माने सुरुवात धडाकेबाज केली पण मोठी खेळी करण्यात त्याला अपयश आले. शुभमन गिलने दोन अर्धशतके झळकावली पण त्याला अर्धशतकाचे रूपांतर शतकात करता आले नाही. के एल राहुलने पहिल्या सामन्यात शतक झळकावले पण पुढच्या दोन सामन्यात त्याला खास काही करता आले नाही एकूणच विराट कोहली वगळता एकही खेळाडू आपल्या लौकिकास साजेसा खेळ करु शकले नाही त्यामुळेच भारताला हा पराभव स्वीकारावा लागला आहे. भारतीय संघाला सातत्याने मिळत असलेल्या अपयशाचे आत्मचिंतन भारतीय संघाने, निवड समितीने आणि संघ व्यवस्थापनाने करायला हवे. जर पराभवाचे आत्मचिंतन केले नाही तर भविष्यातही या पराभवाची पुनरावृत्ती होऊ शकते याचे भान भारतीय संघाने ठेवावे.

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**

---

### पानसरे हत्या प्रकरणात गोवण्यात आलेले निष्पाप समीर गायकवाड यांचे निधन !

# समीर यांचे निधन, हा व्यवस्थेने घेतलेला बळीच ! - सनातन संस्था

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - सनातन संस्थेचे साधक श्री. समीर गायकवाड यांचे आज दुर्दैवी निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, अशी प्रार्थना आम्ही करत आहोत. समीर यांना २०१५ मध्ये कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणात नाहक अटक करण्यात आली. एका गाडीवरून आलेल्या दोन मारेकऱ्यांनी हत्या केली. त्यातील एक समीर गायकवाड, असे तपास यंत्रणांनी सांगितले. एक शाळकरी मुलगा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून आणला; पण वर्षभरातच ते दोन खूनी भलतेच आहेत म्हणून जाहीर केले. याचाच अर्थ समीर गायकवाड निर्दोष होते. तुरुंगातही त्यांना त्रास भोगावा लागला. १९ महिने तुरुंगात डांबून ठेवण्यात आले होते. त्यानंतर ते जामीनावर होते; मात्र न केलेल्या गुन्ह्यामध्ये अडकवल्याने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबियांवर या गोष्टीचा प्रचंड मानसिक ताण होता. पानसरे खून खटल्यातील आरोपी ही प्रसिद्धीमाध्यमांतून झालेली बदनामी इतकी मोठी होती की व्यवसाय, नोकरी अशा सर्व ठिकाणी त्यांना त्रास झाला. सामान्य शेतकरी कुटुंबातील या निष्पाप साधकाचा तपास यंत्रणांनी केलेला छळ आणि पुरोगाम्यांनी केलेली बदनामी यांमुळे त्यांचे जीवन उद्ध्वस्त केले होते. लोकशाही आणि व्यक्तीस्वातंत्र्य धाब्यावर बसवत समीर गायकवाड यांना कोल्हापूरातून वकीलही मिळू दिला गेला नव्हता. या आणि अशा अनेक व्यवस्थेच्या अत्याचारांना त्यांना सामोरे जावे लागले; दुर्दैवाने आज त्यांचे निधन झाले. हे निधन नसून व्यवस्थेने त्यांचा बळी घेतला आहे, असेच म्हणावे लागेल, अशी प्रतिक्रिया सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी दिली आहे.



जेव्हा समीर गायकवाड यांना अटक करण्यात आली, त्या वेळी तपासादरम्यान पोलिसांना आढळून आले की, पानसरेंच्या हत्येच्या दिवशी समीर गायकवाड पालघर येथे होते; पण दबावामुळे त्यांनी ते न्यायालयासमोर आणले नाही. बचाव करतांना हे समीर गायकवाड न्यायालयासमोर आणू शकले असते; पण कदाचित आता ती संधी गेली. या प्रकरणात आजही त्यांची आरोपी क्र. १ म्हणून त्यांची नोंद आहे; परंतु समीर यांना जामीन मिळाल्यावर पोलिसांनी नवीन ‘थिअरी’ मांडत पानसरे यांचा खून सारंग अकोलकर आणि विनय पवार यांनी केला, असे जाहीर केले. काही महिन्यांनी पुन्हा नवीन दोन नावे समोर आणली. समीर हे या सदोष तपासाचा नाहक बळी ठरले. पुरोगाम्यांच्या दबावामुळे सनातनच्या साधकांना अडकवण्याचे पाप पोलिसांनी केले का ?

गायकवाड कुटुंबियांच्या दुःखात सनातन परिवार सहभागी आहे. गायकवाड कुटुंबियांशी वेळोवेळी बोलणे झाले, तेव्हा समजले की, या प्रकरणात नाहक गुंतवल्याचा ताण समीर यांच्या मनावर नेहमी होता. त्यांचे सार्वजनिक जीवन उद्ध्वस्त झाले होते. खूनातील आरोपी म्हणून त्यांना नोकरी मिळत नव्हती. या सर्व गोष्टींची भरपाई कोण देणार? अजमल कसाबसारख्या नराधम अतिरेक्याला सरकारी खर्चाने वकील मिळतो, फाशीच्या शिक्षा झालेल्यांसाठी रात्री १ वाजता सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे उघडले जातात; मात्र केवळ एक हिंदु, सनातन संस्थेचा साधक आणि गरीब शेतकऱ्याचा मुलगा आहे म्हणून समीर यांना वकील मिळू दिला जात नाही. शासन त्यांचा जमीन रद्द होण्यासाठी उच्च न्यायालयात जाते. उलट-सुलट पुरावे न्यायालयात पोलीस कोणाच्या दबावामुळे दाखल करतात ?

पुरोगाम्यांच्या वैचारिक दहशतवादाने शासनावर दबाव आला आणि आज शेवटी एक त्याचा बळी गेला, याचे दुःख आम्हाला आहे. भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी स्टॅन स्वामी यांच्या मृत्यूनंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या न्यायमूर्तींनी शोक व्यक्त केला होता. संयुक्त राष्ट्र संघाने शोक व्यक्त करणारे प्रसिद्धीपत्रक जारी केले होते. समीर गायकवाडसाठी कोणी उभा राहणार का, हा प्रश्नही इथे नमूद करण्यासारखा आहे, असेही श्री. राजहंस यांनी म्हटले.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्फत स्तनपान विषयक नावीन्यपूर्ण उपक्रम

# मातेचे दूध म्हणजेच अमृत -अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील गांधीचमन येथील जिल्हा रुग्णालयात अधिक्षक डॉ.एस.झेड.गवारे रुजू झाल्यापासून सतत विविध रुग्ण हितासाठी नावीन्य पूर्ण उपक्रम घेतले जातात. असाच एक स्तनपान विषयक उपक्रम शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्त्री रोग व प्रसूती विभागामार्फत डॉ. वर्षा देशमुख व डॉ. ज्योती कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय वैद्यकीय विद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

मातेचे दूध हे नवजात बाळासाठी अमृत असते ते जन्मतहा तात्काळ पाजणे आवश्यक असते, असे डॉ.सईदा अफरोज यांनी आपल्या भाषणाप्रसंगी सांगितले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. सईदा अफरोज या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपअधिष्ठाता डॉ. गट्टानी,डॉ. कुरील व श्री अविनाश जाधव, सह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या विशेष कार्यक्रमात नवीन सुरुवात करत असलेल्या स्तनपान मार्गदर्शन कक्षाबाबत सविस्तर माहिती व मार्गदर्शन स्त्री रोग वभिागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख यांनी दिली. तर शासकीय वैद्यकीय महाविद्याल,ज्लिहा स्त्री रुगणालयाच्या कामकाजबाबत सविस्तर माहिती बधीरीकरण वभिागप्रमुख डॉ. ज्योती कुलकर्णी यांनी दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज यांनी रुग्णालयातील सर्व कक्षाची पाहणी केली व कामकाजबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी अधिष्ठातामार्फत स्त्री रोग व प्रसूती विभाग व बधीरीकरण वभिागप्रमुख यांच्या कार्यालयाचे फित कापून उद्घाटन केले. जिल्हा स्त्री रुग्णालयातील विविध बाबीबाबत वर्ग १ स्त्री रोग तज्ञ डॉ. प्राची तारसेट्टीवर यांनी माहिती दिली तर अधिपरिचारिका व प्रसूती वषियक कामकाजबाबत माहिती प्रभारी मेट्रॉन विद्या पवार यांनी दिली. रुग्णालयातील सर्व विभागातील प्रमुख इन्चार्ज सिस्टर यांनी दालनात नूतन अधिष्ठाता डॉ.सईदा.अफरोज यांचे स्वागत केले व कामकाजबाबत माहिती दिली. या कार्यक्रमासाठी रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी अधिपरिचारिका, महिला कर्मचारी व प्रसूत महिलांचे महिला नातेवाईक उपस्थित होते. सर्वांनी या नावीन्य पूर्ण उप्रमाबाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा स्त्री रुग्णालय हे रुग्ण सेवेबाबत महत्वाचे रुग्णालय आहे. दरमहा या रुग्णालयात ६००-६५० प्रसूती, १००-१५०सिझर होतात. तसेच जन्म:त बाळाला लसीकरण केले जाते. अधिक्षक डॉ. एस.झेड. गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली या रुग्णालयाने शिस्त,स्वच्छता, सुरक्षा याबाबत कायापालट केला आहे. त्यामुळे र्सवसामान्य जनतेत या रुग्णालयाबाबत सर्व स्तरावरून समाधान व्यक्त होत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्त्री रोग विभागामार्फत चालू करण्यात आलेला हा स्तनपान वषियक कार्यक्रम अत्यंत स्तुतीप्रिय आहे. त्याबद्दल नूतन शासकीय वैद्यकीय विद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज यांचे व वभिागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख, डॉ. ज्योती कुलकर्णी, डॉ. प्राची तारसेट्टीवर यांचे सर्व कर्मचारी व रुग्ण नातेवाईकांकडून अभिनंदन होत आहे. डॉ.संतोष राऊत,डॉ. पियुष होलानी,डॉ.राजगिरे यांनी या कार्यक्रमाबाबत मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट कार्याबद्दल अधिष्ठातांच्या हस्ते सुरक्षा रक्षक दीपाली व अनिकेत यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वभिागप्रमुख डॉ. बोकणकर,डॉ. वेदा गोयल,डॉ. गायकवाड हे देखील उपस्थित होते.या कार्यक्रमाची सर्व तयारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाती अधिपरिचारक श्री आशिष भालटतिलक व श्री विवियन ब्रदर यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्य औषध निर्माण अधिकारी शहानवाज अहमद यांनी केले.

# 'शहरातील प्रत्येक समस्या सोडवणे हा आमचा संकल्प'



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर आबा दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने वजियी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने वैभव कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, माझ्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण भदनेकर आम्हाला मोठ्या मताधिक्यांनी आपण निवडून दिले असून, नागरिकांचा विश्वासच आपली खरी ताकद असल्याचे सांगत, येणाऱ्या काळात प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या समस्या सोडवून प्रभाग क्रमांक १ चा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्पष्ट केले की, ''प्रभाग क्रमांक १ चा विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून, प्रत्येक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''

यावेळी प्रतिक भैय्या दानवे, श्री. जीवन सले, श्री. रवी सले, श्री. अजित मानधनी आदी यांच्यासह प्रभागातील सांगळे काका-काकू, भाऊराव फदाट, शामराव राठोड, निवरकर साहेब, सुशीलकुमार बेघानी, शेख साहेब, काळे साहेब, कपलि दहेकर,मनोज भैय्या वाघ, भरत निवरकर, बबलू टेकाळे, गजानन बागल, विकास राठोड, रवी जाधव, विशाल फदाट, राहुल जामुंदे, सौरभ उंद्रे व आदित्य उगले आदींची उपस्थिती होती.

## पान १ वरुन

## मंठा येथून ...

अंदाजे किंमत ३ लाख रुपये आहे. या प्रकरणात पोलीस ठाणे चंदनझिराचे पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार यांना गुप्त बातमीदारामार्फत सदर चोरीचे वाहन एमआयडीसी परिसरात असल्याची माहिती मिळाली.

माहितीची खात्री करून त्यांनी तात्काळ आपल्या पथकाला सूचना दिल्या. त्यानुसार चंदनझिरा पोलीस ठाण्यातील अमलदारांनी एमआयडीसी भागात शोधमोहीम राबवली असता चोरीस गेलेले पिकअप वाहन मिळून आले.

पोलिसांनी सदर वाहन ताब्यात घेऊन सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर पुढील तपासासाठी पोलीस ठाणे मंठा यांच्याशी संपर्क साधून सदर वाहन मंठा पोलीस ठाण्याचे तपासी अंमलदार पोहेकॉ जे. डी. सुक्रे यांच्या ताब्यात देण्यात आले.

सध्या या प्रकरणाचा पुढील तपास मंठा पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस ठाणे चंदनझिरा येथील पुढील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई केली. पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार एएसआय मन्सुब वेताळ, पोलीस हेडकॉन्स्टेबल कृष्णा तंगे, पोलीस नाईक शरद पवार, पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर ढाकणे. अल्पावधीत चोरीस गेलेले वाहन शोधून काढल्यामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत असून चंदनझिरा पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले जात आहे. अशाच प्रकारे कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे चित्र आहे.

## दोन वर्षातील ...

पळवून नेले आहे.

या तक्रारीवरून सेवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्राथमिक तपासात आरोपी व पिडीता मिळून न आल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दिनांक ०६ ऑगस्ट २०२५ रोजी सदर गुन्ह्याचा पुढील तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, जालना यांच्याकडे सोपविण्यात आला.

प्रभारी अधिकारी यांनी प्रकरणातील सर्व कागदपत्रांचा अभ्यास करून गुप्त बातमीदारांची नियुक्ती केली. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आरोपीचा मोबाईल क्रमांक हस्तगत करून तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. या तपासातून आरोपी व पिडीता गर्दी फाटा, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ कारवाई करत दोघांनाही ताब्यात घेतले व पुढील तपासासाठी पोलीस ठाणे सेवली येथे सुपूर्द करण्यात आले.

**गोंदी पोलीस ठाण्यातील गुन्ह्याचा छडा**

तसेच पोलीस ठाणे गोंदी येथे दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी फिर्यादी लक्ष्मण रखमाजी पवार यांनी तक्रार दिली होती की, आरोपी रोहित राम मोरे (रा. महाकाळा कारखाना, ता. अंबड, जि. जालना) याने त्यांच्या अल्पवयीन मुलीला दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी गंधारी गायरान वस्ती, ता. अंबड येथून फुस लावून पळवून नेले आहे.

या तक्रारीवरून गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, आरोपी व पिडीता मिळून न आल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी या गुन्ह्याचा तपासही अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे सोपविण्यात आला.

तपास पथकाने पुन्हा गुप्तबातमीदारांच्या मदतीने आरोपीचा मोबाईल क्रमांक शोधून काढत तांत्रिक विश्लेषण केले. त्यानुसार आरोपी व पिडीता चिखली केडगाव, ता. पलूस, जि. सांगली येथे असल्याचे निष्पन्न झाले.

तत्काळ कारवाई करत पथकाने दोघांना ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी पोलीस ठाणे गोंदी येथे हजर केले.

ही संपूर्ण कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री. अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकात प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पोलीस हेडकॉन्स्टेबल कृष्णा देठे, सागर बावीस्कर (स्थागुशा), महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, महिला पोलीस अंमलदार आरती साबळे, रेणुका राठोड, चालक पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय कुलकर्णी यांनी अतिशय मेहनत घेऊन ही उल्लेखनीय कामगिरी पार पाडली.

**जिल्ह्यात कौतुकाचा वर्षाव**

दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा छडा लावत पिडीत मुलींची सुरक्षित सुटका केल्यामुळे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. अशा प्रकारच्या संवेदनशील प्रकरणांत जलद व प्रभावी कारवाई केल्याने समाजात पोलीस प्रशासनाविषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## धर्मरक्षणासाठी...

शौर्य जागृती प्रशिक्षण शिबिरात ते मार्गदर्शन करत होते. या महाशिबिरात दुर्ग, राजनांदगाव, रायपूर, खैरागड यांसह अनेक जिल्ह्यांतील १००० हून अधिक युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि स्वसंरक्षणासह धर्मरक्षणाचा संकल्प केला.

कराटे, लाठी आणि नानचाकूचे प्रशिक्षण या शिबिरात युवकांना केवळ बौद्धिकच नव्हे, तर शारीरिकदृष्ट्याही सक्षम करण्यात आले. मुख्य प्रशिक्षक श्री. निरंजन चोडणकर आणि त्यांच्या सहकारी प्रशिक्षकांनी युवकांना कराटे, लाठी काठी आणि नानचाकू चालवण्याचे प्रशिक्षण दिले. कठीण प्रसंगात स्वसंरक्षण कसे करावे, याचे सोपे आणि प्रभावी उपाय प्रात्यक्षिकांद्वारे () दाखवण्यात आले.

छत्तीसगडचे शिक्षणमंत्री श्री. गजेंद्र यादव : ''ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊंनी बाल शिवरायांना शस्त्र आणि शास्त्राचे शिक्षण देऊन हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली, तीच धग आज प्रत्येक युवकामध्ये जागृत करण्याची गरज आहे. बलवान शरीर आणि प्रबळ मनोबलाच्या जोरावरच आपण आपले राष्ट्र आणि कुटुंब सुरक्षित ठेवू शकतो.''

भाजपचे जेष्ठ नेते श्री. प्रबल प्रताप जुदेव : ''सनातन धर्माच्या रक्षणासाठी आजच्या युवकांना शास्त्र आणि शस्त्र या दोन्हीचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. युवकांचा हा उत्साह पाहून सनातन धर्म सुरक्षित हातात असल्याचा विश्वास वाटतो.''

संत पू. अशोक पात्रीकर (सनातन संस्था): ''शारीरिक बळासोबतच आत्मबळही आवश्यक आहे. यासाठी प्रतिदिन श्रीराम जय राम जय जय राम हा नामजप करा. आता अन्याय सहन करायचा नाही, तर त्याचा प्रतिकार करायचा आहे.''

श्री. सुनील घनवट (राज्य संघटक, हिंदू जनजागृती समिती): ''डाव्या विचारसरणीच्या आणि देशविरोधी शक्ती युवकांना शौर्यहीन बनवू पाहत आहेत. याविरोधात आपल्याला सजग राहावे लागेल. स्वसंरक्षण प्रशिक्षण ही राष्ट्ररक्षणाची पहिली पायरी आहे.''

प्रशासनाचे सहकार्य: दुर्गचे पोलीस अधीक्षक () श्री. विजय अग्रवाल आणि उपअधीक्षक () श्रीमती भारती मारकाम यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना स्वसंरक्षणासाठी असलेल्या कायद्याची माहिती दिली आणि आश्वस्त केले की, ''जर तुम्ही स्वसंरक्षणासाठी पाऊल उचलले, तर कायदा पूर्णपणे तुमच्या पाठीशी आहे.''

वैदिक गुरुकुल वेलफेअर फाउंडेशनचे संस्थापक अधिवक्ता आशिष शर्मा यांनी गुरुकुलच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली कानस्कर आणि श्रीमती मेघा राठी यांनी केले, तर प्रस्तावना श्री. कमल बिस्वाल यांनी मांडली. यावेळी महापौर श्रीमती अलका बागमार, आय.जी. श्री. विनोद अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जालना शहरातील ...

कॉलनी परिसरातील प्रलंबित सर्व विकासकामे तातडीने व टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. मागील काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे शिक्षक कॉलनीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी पावसाचे पाणी योग्य पद्धतीने डायव्हर्जन करून सीना नदी व कुंडलिका नदीमध्ये सोडण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. तसेच कॉलनीतील दूषित पाण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात येतील. स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी लाईन तपासणी, दुरुस्ती व आवश्यक तांत्रिक सुधारणा केल्या जातील. नियमित पाणीपुरवठा कसा करता येईल, यासाठी महानगरपालिकेच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून योजना राबवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रचारादरम्यान शिक्षक कॉलनीतील नागरिकांनी दिलेला निःस्वार्थ पाठिंबा व मतदान रूपी विश्वास आम्ही कधीही विसरणार नाही, असे सांगत प्रचारात दिलेले प्रत्येक आश्वासन प्रत्यक्ष पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी केला.

यावेळी जीवन सले, सरचिटणीस अमोल कारंजेकर, कपलि दहेकर, अजित मानधनी, विठ्ठल रुक्मिणी समिती प्रमुख भगवान नाना आनंदे, कौतिक जंजाळ सर, भोसले सर, श्रीकांत सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# कहार; प्राचीन बोली भाषा तिचे संवर्धन होणे काळाची गरज - प्रा.डॉ. दिलीप बिरुटे

**जालना । प्रतिनिधी -** काहार ही प्राचीन बोलीभाषा असून तिचे संवर्धन ,जतन व अभ्यास होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कहार बोलीचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.दिलीप बिरुटे



यांनी जेईएस महाविद्यालय जालना येथे ''बोलीचा जागर'' या कार्यक्रमात केले.

मराठी भाषा पंधरवडा निमित्त महाराष्ट्र शासन मराठी विभाग व जे ई एस महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ''बोलीचा जागर'' या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.नितीन गादेवाड हे होते, प्रमुख अतिथी म्हणून कहर बोलीचे अभ्यासक प्रा.डॉ.दिलीप बरुटे होते, व मराठी भाषा संचनालायाचे सहाय्यक संचालक श्री शरद यादव, व प्रा.आनंद गांगणक होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते. यावेळी व्यासपीठावर मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशवंत सोनूने प्रा. दीपक लिंबे , डॉ. गणेश पांढरे, श्री पांडुरंग गहिरे, श्री आसाराम पुंगासे डॉ.कन्नुलाल विटोरे, सोनाली गव्हाणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

''काहर''ही महाराष्ट्रातील दुर्लक्षित बोलीभाषा असून यामध्ये काहर भोई समाजाचा समावेश आहे. गोदावरी नदीच्या उगमापासून तर महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यात पर्यंत गोदाकाठी ''काहार'' हा समाज वास्तव्यास असून, या दुर्लक्षित बोलीचा जागर व्हावा ,त्याची माहिती व ओळख महाराष्ट्रातील मराठी माणसापर्यंत पोहोचावी यासाठी या एकदिवसीय कार्यक्रमाचे शासनातर्फे आयोजन जेईएस महाविद्यालय जालना येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा .डॉ. यशवंत सोनूने यांनी केले. बोलीभाषा जीवनामध्ये महत्त्वाची असून जशी मानवाला श्वासाची गरज असते तसेच बोलीभाषेचे मानवी जीवनामध्ये महत्त्व आहे बोली टिकली तरच भाषा टिकतील, बोलीभाषा चे जतन केले पाहिजे असे डॉ. सोनूने यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. नितीन गादेवाड म्हणाले की, दर बारा कोसावर भाषा बदलते, भाषेवरून माणूस ओळखला जातो,बोलीभाषा ही त्या समुदायाची मातृभाषा असते तीच खरी त्या लोकांची ओळख असते. अनेक बोलीतून मराठी भाषा विकसित झालेली आहे. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास ती लवकर अवगत होते, असेही डॉ. गादेवाड यांनी सांगितले.

या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा. आनंद गागनक म्हणाले की, राज्यातील ३६जिल्ह्यांमध्ये बोलीभाषांचा जागर हा कार्यक्रम साजरा होत असून मराठी भाषेतून रोजगाराच्या१५० संधी उपलब्ध होत आहेत. मराठी भाषा ही मुख्य नदी असून तिला अनेक बोलीभाषाचे ओढे मिळालेले आहेत. त्यामुळेच मराठी भाषा समृद्ध झाली असून, बोलीच्या विविधतेमुळे भाषेचे सुलभीकरण होते. यामुळे आज मराठी भाषा समृद्ध झाली आहे. कहर बोली भाषा टिकावी व तिचे जतन व्हावे तिचा विकास व्हावा त्यासाठी या बोलीभाषेतील लोकसाहित्याचा अभ्यास व्हावा, ''बोली वाचवा भाषा टिकवा'' या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचेही प्रा.गांगणाक यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी कहार बोलीचे अभ्यासक प्रा.डॉ. दिलीप बिरुटे बोलताना म्हणाले की, कहार बोली ही बुंदेलखंडातून महाराष्ट्रात आली असून कहार बोली मध्य प्रदेश माळवा ,खानदेश पुढे मराठवाडा असा तिचा प्रवास झाला आहे. कहार बोलीच्या अनेक लोककथा असून, त्या बुंदेलखंडी हिंदी भाषेत व कहार बोलीत आहेत. कहार हे पूर्वीच्या काळी रोराणी महाराजांच्या पालखी घेऊन जाण्याचे काम करत असत. राजाला आपली भाषा समजू नये म्हणून ते सांकेतिक भाषेत काहार बोलीत एकमेकांशी संवाद साधत. अमेरिकन मासिक होलकर मध्ये १९६८ सारी कहार लोकांच्या इतिहासावर लेख प्रसिद्ध झाला आहे, गोर+ कहार डोली वाहण्याचे काम करत होते. ते राज दरबारी काम करत होते परंतु ते अस्पृश्य नव्हते. भाल दरबारातील भाषा व दरबारी मंडळी कार बोली बोलत होते. अर्ध मागधी भाषेची बुंदेल बोलीभाषा असून, बुंदेल बोलीची काहार ही बोली आहे. शंकर-पार्वतीची कथाही काहार सांगून, इतिहासही उलगडून दाखवला. कार बोलतील वाक्प्रचार म्हणी लोककथा शब्दार्थ याचेही दर्शन त्यांच्या भाषनातून झाले , कार समाजाच्या परंपरा आचारधर्म लोकधर्म याविषयीची माहिती प्रा. बिरुटे यांनी सांगितली.

कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री म्हणाले की कारवली ही प्राचीन असून त्यांच्या साहित्यावर अभ्यास झाला पाहिजे तसेच इंडोलॉजी भाषावरअभ्यास होणे ,आज गरजेचं आहे. जे लोक बोली भाषेतून बोलतात त्यांचे आरोग्य चांगले राहते जे प्रमाण भाषेतून बोलतात त्यांना मात्र आरोग्याच्या समस्या आज दिसतात असेही विनोदी वक्तव्य डॉ.अग्निहोत्री यांनी केले. महाराष्ट्रातील कहार बोली सारख्या दुर्लक्षित बोलींचं संवर्धन व अभ्यास

होणे ही काळाची गरज आहे, असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

मुख्य कार्यक्रमांतर कार समाजातील जस गीत गायन तसेच लोकगीतांचे सादरीकरण झाले,काही कविताही काहार समाजातील तरुणांनी सादर केल्यात. सोनाली गव्हाणे या युवा कवयित्रीने ''काहार भाषा आपलो बोलत जावो, आपलो कहार भाषा शान शे.. '' ही दर्जेदार कविता कहार बोली तून सादर केली., यावेळी गोंदी शहागड पाथरवाला संभाजीनगर तसेच मराठवाड्यातून गोदाकाठचे अनेक कार समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. बाळकृष्ण विटोरे ,प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे प्रा. डॉ.मोहिते प्रा. बिन्नीवाले, प्रा. खंडागळे, प्रा. महेर, प्रा. मुंडे आदीनी विशेष परिश्रम घेतलेत.

कार्यक्रमाचेसूत्रसंचालन प्रा. डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.यास्मिन शेख यांनी मानलेत.

# संकुचित वृत्ती सोडून व्यापक होणे म्हणजे परमार्थ - डॉ प्रमोद महाराज कुमावत

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** आयुष्यभर ईश्वरसेवा करून शेवटी परब्रम्ह परमात्मा पांडुरंगाची भेट झाली, तसेच सर्व मागील दू:खाचा नाश झाला तरच परमार्थ पूर्ण झाला आहे असे समजावे. माणूस विचाराने संकुचित वृत्तीचा झाला म्हणून तो लहान झाला. वृत्तीला व्यापक करणे म्हणजे परमार्थ होय असे प्रतिपादन परतुर येथे आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताहात बोलताना वेदांताचार्य हभप डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले.



संसारातील दुःखाची निवृत्ती कितीही केली तरी ती अत्यांतिकनिवृत्ती नसते तर संसारात दुःख हे पुन्हा पुन्हा निर्माण होत राहते. अज्ञानासहित संसार दुःखाची निवृत्ती ती आत्यंतिक निवृत्ती होय व सत्यज्ञानानंदस्वरूप परमात्म्याच्या प्राप्तीत खरे समाधान आहे. परमात्म्याचे स्वरूप व्यापक आहे. तो सच्चिदानंद स्वरूप आहे. त्याच्या ठायी रूप वर्ण गुण नाहीत. हे धर्म स्थूल देहाचे आहेत असे ते म्हणाले.

सत्य ज्ञानानंद गगनाचें प्रावर्ण।

नाहीं रुप वर्ण गुण जेथे ।।१।।

तो हारे श्रीहरी पाहिला डोळेभरी ।पाहते पाहणें दुरी सारोनिया ।।२।।ज्ञानदेव म्हणे ज्योतिची निजज्योती ।ते हे उभी मूर्ती विटेवरी ।।३।। या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या अभंगावर त्यांनी निरूपण केले. दोन लक्षणांद्वारे परमात्म्याची निरूपण केले जाते एक तटस्थ लक्षण व दुसरे स्वरूप लक्षण. या अभंगांमध्ये ज्ञानेश्वर महाराजांनी सुरू पण लक्षणाद्वारे परमात्म्याची ओळख करून दिलेली आहे. परमात्म्याच्या व्यापकत्वाला जाणल्याने मनुष्य व्यापक वृत्तीचा होत असून वृत्ती शून्य ब्रह्म स्थितीला तो प्राप्त होत असतो त्यामुळे संकुचित विचाराला टाकून देऊन व्यापक विचाराला धारण केले पाहिजे श्रवण मनन निदिध्यासन करून परमात्म्याची प्राप्त करून घेणे हा परम पुरुषार्थ होय असे ते म्हणाले.

यावेळी हभप डॉ वामनराव वैद्य गुरूजी, सोपान महाराज सांगुळे, बाबुराव महाराज मगर,भागवत महाराज काकडे, तुळशीदास महाराज, नामदेव शास्त्री, ॲड महेश उफाड,जगन वायाळ आदी परीसरातील भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# चैतन्यसाधना रिसर्च फाउंडेशनकडून डॉ. सोमनाथ जईद यांना उत्कृष्ट कार्याबद्दल सेवा पुरस्कार

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** महाराष्ट्रात होमिओपॅथी वैद्यक क्षेत्रात उल्लेखनीय व सातत्यपूर्ण रुग्णसेवा केल्याबद्दल डॉ. सोमनाथ जईद ( होमिओपॅथी) यांना चैतन्य साधना रिसर्च फाउंडेशनच्या वतीने सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार चैतन्य साधना रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.प्रमोद कुमावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ प्रकाश मांटे उपस्थित होते. रुग्णसेवेत दिलेले योगदान, नैतिक उपचार पद्धती आणि दीर्घकालीन आजारांवरील प्रभावी होमिओपॅथिक उपचार यांची दखल घेऊन हा सेवा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. पुरस्कार स्वीकारताना डॉ. सोमनाथ जईद यांनी हा सन्मान आपल्या रुग्णांना, सहकाऱ्यांना व मार्गदर्शकांना समर्पित करत, भविष्यातही निःस्वार्थ भावनेने समाजोपयोगी वैद्यकीय सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला.

डॉ. सोमनाथ जईद हे लाईफ केअर होमिओपॅथी क्लिनिक येथे कार्यरत असून, त्यांच्या या सन्मानामुळे होमिओपॅथी क्षेत्रात मोलाची भर पडली आहे असे प्रतिपादन डॉ प्रमोद कुमावत यांनी केले आहे. लाईफ केअर होमिओपॅथी क्लिनिक जालना येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## राष्ट्रवादीत अंडरस्टँडींग

**पुणे -** जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस या पक्ष चिन्हांचा सोयीनुसार वापर करण्यात येणार आहे. जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथे ते चिन्ह वापरून उमेदवार उभे केले जाणार आहेत. महापालिका निवडणुकांनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र बैठक करुन ही स्ट्रॅटेजी ठरवली आहे. पुणे जिल्ह्यात आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमधे देखील घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस अशा दोन्ही चिन्हांवर राष्ट्रवादीचे उमेदवार निवडणूक लढणार आहेत. दोन पक्षांमधील अंडरस्टँडिंग देखील निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचं चित्र आहे.

# खबरदार मुलींना छेडाल तर ! - ए.पी.आय.आरती जाधव

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** कै बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय व रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयामध्ये शालेय विद्यार्थ्यांनीसाठी जनजागृती करण्यासाठी कदीम पोलीस स्टेशनच्या ए.पी.आय आरती जाधव यांनी विद्यार्थिनींना छेडणाऱ्या , मुलींचा छळ करणाऱ्या मुलांना सक्त ताकीद दिली. खबरदार जर मुलींना छेडल तर बालगृहात जाल असे त्या म्हणाल्या. शाळेत जातांना किंवा घरी जातांना कोणी पाठलाग करत असेल किंवा टकलावून पाहत असेल तर शिक्षकांकडे किंवा पोलिसांकडे तक्रार करा, मुली पोलीस स्टेशनला येण्यासाठी घाबरतात अजिबात न घाबरता मुलींनी यावे तक्रार करावी. स्व संरक्षणाचे धडे घ्यावे. रोज वर्तमान पत्रे वाचावीत स्वतः ला धाडसी बनवावे असे यावेळी त्यांनी संबोधित केले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल राठोड मॅडम यांनी हीच आमची प्रार्थना ही प्रार्थना घेऊन वाईट प्रवृत्ती ने वागू नये मुली ह्या आपल्या बहिणप्रमाणे असतात तसेच दामिनी पथकच्या हेडकॉन्स्टेबल खरजुले मॅडम गायकवाड मॅडम, ज्योती राठोड मॅडम जनजागृती वाहनाचे पोलीस कॉन्स्टेबल इन्चार्ज गौतम बोबडे सर, रामेश्वर देशपांडे उपस्थित होते. तदनंतर जनजागृतीपर विद्यार्थिनींच्या,नारी शक्तीच्या काही चित्रफिती दाखवण्यात आल्या. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी कुलकर्णी यांनी ए.पी.आय. आरती जाधव, दामिनी पथकच्या हेडकॉन्स्टेबल खरजुले मॅडम यांचे अलकनंदा गाडेकर यांनी, गायकवाड मॅडम यांचे नन्नवरे मॅडम यांनी स्वागत केले.रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापिका श्रीमती. मनीषा देव यांनी ज्योती राठोड यांचे तर अरुणा वाघमारे यांनी खरजुले यांचे स्वागत केले,पोलिस कॉन्स्टेबल गौतम बोबडे यांचे संदीप इंगोले यांनी, रामेश्वर देशपांडे यांची मदन सोजे यांनी, पठाण मॅडम यांचे अनघा जोशी यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री संदीप इंगोले यांनी केले. यावेळी शिक्षक दिनेश राठोड, सुशील म्हस्के, भीमाशंकर कुलकर्णी, राजाराम साबळे विद्यार्थी उपस्थित होते.

